जा.क्र.जिपगों/आवि/अ-५/ २२७४/२०१७
कार्यालय-जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद गोंदिया
दिनांक.- ३१/०७ /२०१७

**संदर्भ-१)** महाराष्ट्रशासन, सार्वजनीक आरोग्य विभाग शासन परिपत्रक क्रमांक मवैअ.२०१५/प्र.क्र. ७३९/निम/सेवा३,दि.२४जुन २०१६.

२) महाराष्ट्रशासन, सार्वजनीक आरोग्य विभाग शासन परिपत्रक क्रमांक मवैअ.२०१५/प्र.क्र. ७३९/निम/सेवा३,दि.२६ऑक्टोंबर २०१६

३)सहसचिव, महाराष्ट्रशासन, सार्वजनीक आरोग्य विभाग,मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक मवैअ २०१६/प्र.क्र.८७५/१६ /सेवा ३,दिनांक १६नोव्हेंबर २०१६.

४) महाराष्ट्रशासन, सार्वजनीक आरोग्य विभाग शासन परिपत्रक क्रमांक मवैअ.२०१७/प्र.क्र. १८१/१७/सेवा-३ दिनांक ४/५/२०१७

५)जिल्हा निवड समिती गोंदिया कार्यवृत्त दिनांक १४/६/२०१७

**आदेश-**

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयातील तरतुदीनुसार जिल्हा निवड समिती गोंदिया द्वारा निवड केलेल्या निम्नलीखीत उमेदवाराची प्रवर्गनिहाय आरक्षणनुसार पात्र ठरलेल्या एमबीबीएस शैक्षणिक अर्हतेनुसार महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य वैद्यकीय अधिकारी गट-अ या पदावर वेतन श्रेणी रुपये १५६००/- ३९१००/- **ग्रेड वेतन** ५४००/- मध्ये दरमहा नियमाप्रमाणे मिळणा-या एकुण भत्त्यासह आदेशात नमुद केलेल्या अटी व शर्तीवर नामनिर्देशनाने अस्थायी रित्या नेमणूक करण्यात येत असून त्यांची पदस्थापना त्यांचे नावासमोर नमुद केलेल्या ठिकाणी पुढील आदेशापर्यंत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | निवड केलेल्या अधिका-यांचे नांव | पदस्थापनेचे ठिकाण | नियुक्तीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | डॉ.नितेश ईश्वरलालजी उपाध्याय | ग्रामिण रुग्णालय,साकडक/अर्जुनी | खुला (सर्वसाधारण) |
| २ | डॉ.नेहा सुनिल बावनकर | प्रा.आ.केंद्र, रावणवाडी | ईमाव (महिला) |
| ३ | डॉ.किर्तीकुमार लक्ष्मीचंद चुलपार | प्रा.आ.केंद्र, कु-हाडी | खुला (सर्वसाधारण) |

**नेमणूक खाली दिलेल्या अटी व शर्तीनुसार देण्यात येत आहे.**

१) सदर वैद्यकीय अधिकारी यांनी वैद्यकीय तपासणी व पुर्व चारित्र्य पडताळणी सक्षम प्राधीका-यांकडून करुन त्याबाबतचे प्रमाणपत्र ६ महिण्याचे आंत प्राप्त करुन घ्यावे.सदर प्रमाणपत्राची विहीत मुदतीत पुर्तता करण्याबाबतची जबाबदारी जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांची राहील.

२) आवश्यकतेनुसार जात वैद्यता प्रमाणपत्र तसेच अप्रगत गटात मोडत असल्यास (नॉन क्रिमीलीअर) प्रमाणपत्र या आदेशाच्या दिनांकापासून ६ महिण्याचे आंत सादर करावे. या प्रमाणपत्राची पुर्तता ६ महिण्याच्या कालावधीत न झाल्यास त्यांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. सदरील प्रमाणपत्राची विहीत मुदतीत पुर्तता करुन घेण्याची जबाबदारी सबंधीत जिल्हा आरोग्य अधिकारी यांची राहील.

३) तसेच वैद्यकीय अधिकारी यांची मुळ प्रमाणपत्रे,कागदपत्रे व वयोमर्यादा पुन्हा एकदा तपासून त्यानंतर नियुक्तीच्या ठिकाणी हजर करुन घ्यावे.

४) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ सवर्गातील वैद्यकीय अधिकारी पदाचा कार्यभार धारण केलेल्या दिनांकापासून २ वर्ष इतका कालावधी हा परिविक्षाधिन स्वरुपाचा राहील. परिविक्षाधिन कालावधीत त्यांच्या कामाचा अपेक्षीत दर्जा प्राप्त न केल्यास किंवा वर्तणूक अयोग्य आढळल्यास त्यांची सेवा संपुष्टात आणली जाईल किंवा त्यांचा परिविक्षाधिन कालावधी १ वर्षाच्या कालावधीसाठी वाढविला जाईल.त्या वाढविलेल्या कालावधीमध्ये देखील त्यांचे काम समाधानकारक झाले नाही तर त्यांची सेवा कोणत्याही पुर्वसूचनेशिवाय समाप्त करण्यात येईल.

५) नियुक्ती केलेल्या उमेदवारांची ३ वर्षापर्यंत बदली होणार नाही व त्यांचे बदलीचा विचार केला जाणार नाही. मा.लोकप्रतिनिधी वा अन्य माध्यमातून बदलीबाबत शासनावर दबाव आणल्यास/आल्यास सबंधीत उमेदवारांकडून सदर कृती केल्याचे ग्राहय धरुन, सबंधीत उमेदवार महाराष्ट्रनागरी सेवा नियमानुसार शिस्तभंगविषयक कार्यवाहीस पात्र राहतील किंबहूना नियुक्तीच्या आदेशामधील अटी व शर्तीचा भंग समजून बिनाचौकशी त्याची सेवा समाप्तीबाबत कारवाही केली जाईल.

६) परिविक्षा कालावधी मधील वेतन वाढ शासनाने विहीत केलेल्या नियमानुसार अनुज्ञेय राहील परिविक्षा कालावधी पुर्ण केल्याशिवाय त्यांना पुढील वेतन वाढ अनुज्ञेय होणार नाही.

७) त्यांचे नावाची नोंदणी महाराष्ट्र व्यवसायीक अधिनियम १९६१ अथवा महाराष्ट्र वैद्यकीय परिषद १९६५ खालील या नियुक्तीपुर्वी केली असली पाहीजे किंवा भारतीय वैद्यकीय नोंदवहीमध्ये नियुक्तीपूर्वी नोंद झाली असली पाहीजे.

८) त्यांना एक पत्नी/पती हयात असतांना दुसरा विवाह करता येणार नाही.

९) एक महिण्याच्या पुर्वी सुचना दिल्याशिवाय अगर १ महिण्याची आगाऊ वेतनपुर्ती केल्याशिवाय त्यांना सेवामुक्त होता येणार नाही.

१०) त्यांना त्यांचे सेवाकालावधीत केंद्रशासनाने विहीत केलेल्या अधिवर ४ वर्षाच्या कालावधीकरिता (प्रशिक्षण कालावधी धरुन) जरुरी पडल्यास भारत सरंक्षण किंवा सेवेशी सबंधीत अशा पदावर त्यांना काम करावे लागेल हे दायीत्व सेवेच्या पहिल्या १० वर्षापर्यंत मर्यादित राहील व ४५ वर्षाच्या वयानंतर सर्वसाधारणपणे लागू होणार नाही.

११) त्यांना शासन विहित करिल त्याप्रमाणे प्रशिक्षण पार पाडावे लागेल.सदर उमेदवारांना ३ वर्ष सेवाकालावधी पुर्ण केल्याशिवाय पदवीत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेता येणार नाही.

१२) त्यांना खाजगी व्यवसाय करण्यास प्रतिबंध राहील.

१३) त्यांना हिंदी आणि मराठी भाषा परिक्षेसबंधीच्या नियमावलीनुसार जर ते या परिक्षा अगोदर उत्तीर्ण झाले नसतील किंवा उत्तीर्ण होण्यापासून त्यांना सुटमिळाली नसेल तर त्यांनी एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी विषयाची परिक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण होण आवश्यक राहील. अन्यथा तदनंतर त्यांचे पुढील वेतनवाढी रोखून ठेवण्यात येईल.

१४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक -प्रशिक्षण - २०००/प्र.क्र.६१/२००१/ ३९, दिनांक १९/३/२००३ शासन सेवेतील नियुक्तीकरिता संगणक हाताळणी /वापरावयाचे ज्ञान एक अतिरिक्त आवश्यक अर्हता म्हणून निश्चित करण्यात आलेले आहेत.यास्तव या शासन निर्णयाद्वारे नियुक्ती देण्यात येणा-या वैद्यकीय अधिका-यांची शासन मान्यता प्राप्त संगणक हाताळणी /वापराबाबतचे आवश्यक ते प्रमाणपत्र जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे सेवेत रुजू झाल्याचे दिनांकापासून १ वर्षाचा कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

१५) या उमेदवारांना शासन सेवेत कमीत कमी ५ वर्ष राहण्याचे किंवा न राहिल्यास रुपये ५००/- अगर शासन वेळोवेळी विहीत करिल ती रक्कम दंड म्हणून देण्याचे बंधन राहील. तसेच इतर सेवाशर्तीच्या पुर्ततेसाठी बंधपत्र लिहून घ्यावे लागेल.

१६) सदर उमेदवारांना मुख्यालयात राहणे बंधनकारक आहे व त्यांचे वेतन हे बायोमेट्रिक हजेरीशी संलग्न असेल.

१७) शासनाने दिलेले निवासस्थानामध्ये राहणे बंधनकारक राहील. तसेच ते भाडयाने देता येणार नाही.

१८) राष्ट्रीय आरोग्य अभियान व अन्य शासनाकडून वेळोवेळी जाहीर करण्यात येणारी आरोग्य विषयक अभियान नागरीकांची सनद, सेवाहमी कायदा, मुख्यालयाकडून येणारे आदेश याची अमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

१९) उमेदवाराने पदस्थापनेचे आदेश प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून **१५ दिवसाच्या** आंत त्याच्या नेमणूकीच्या ठिकाणी रुजू झाले पाहीजे. अन्यथा **१५ दिवसानंतर** सदर नियुक्तीचे आदेश आपोआपच रद्द होतील. १५ दिवसानंतर संबंधीत जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांनी हजर करुन घेवू नये.

२०) स्वतंत्र निवड मंडळाने जाहीर केलेल्या यादीतील उमेदवाराची जेष्ठता यादीत दर्शविलेल्या गुणांकावर आधारीत गुणानूक्रमानुसार (मेरिट लिस्ट) ठरविण्यात येईल व त्यासबंधीचे आदेश स्वतंत्र निवडमंडळाकडून स्वतंत्ररित्या निर्गमीत करण्यात येतील.

२१) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ या संवर्गातील नामनिर्देशनाने नियुक्ती झाल्यावर त्याचे वेतन महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील तरतुदीनुसार निश्चित केले जाईल.सदर उमेदवारांना वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक -अंनियो-१००५/१२६/सेवा-४,
दिनांक ३१/१०/२००५ च्या तरतुदीनुसार परिभाषीक अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आलेली आहे.सध्या अस्तीत्वात असलेली निवृती वेतन योजना म्हणजेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृतीवेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृतीवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ आणि सध्या अस्तीत्वात असलेली भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

२२) उमेदवाराने पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होतांना विहीत नमुण्यातील साक्षांकन नमुना, आवश्यक ती माहिती भरुन सबंधीत कार्यालय प्रमुखाकडे सादर करावा कार्यालय प्रमुखाने सदर साक्षांकन नमुना सहसंचालक, (प्रशासन व

अर्थसंकल्प ) ,आरोग्य सेवा मुंबई यांचेकडे १५दिवसात पाठवावा व त्याची पोच सदस्य सचिव तथा जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे सादर करावी.

२३) सदर आदेश जिल्हा परिषदेच्या **www.zpgondia.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

२४) सदर नियुक्ती आदेश सहसचिव,महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग २ मंत्रालय मुंबई यांचे पत्र दिनांक १६ नोव्हेंबर २०१६ मधील मुद्या क्रमांक ०६ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.तसेच सदर नियुक्ती आदेश शासनाकडून कार्योत्तर मान्यतेच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

**अध्यक्ष,जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हाधिकारी गोंदियाकरिता**

**प्रतिलीपी-**

१) मा.प्रधान सचिव, महाराष्ट्रशासन सार्वजनीक आरोग्य विभाग, मंत्रालय,मुंबई यांना माहितीस सविनय सादर. मा.संचालक,आरोग्य सेवा संचालनालय,मुंबई.
२) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांना माहितीस अग्रेषित.
३) सहसंचालक(प्रशासन व अर्थसंकल्प) आरोग्य सेवा संचालनालय,मुंबई यांना माहितीस अग्रेषित.
४) उपसंचालक, आरोग्य सेवा,नागपूर मंडळ,नागपूर यांना माहितीस्तव अग्रेषित.
५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) जिल्हा परिषद गोंदिया यांना माहितीस्तव अग्रेषित.
६) जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांना माहितीस तथा कार्यवाहीस्तव अग्रेषित.
७) जिल्हा कोषागार अधिकारी गोदिया यांना माहितीस्तव अग्रेषित.
८) गटविकास अधिकारी पंचायत समिती--------------------यांना माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव अग्रेषित.
९) तालुका आरोग्य अधिकारी ----------------तालुका नियंत्रण पथक------------यांना माहितीस्तव अग्रेषित.
१०) वैद्यकीय अधिकारी प्रा.आ.केंद्र---------------यांना माहितीस्तव अग्रेषित.
११) डॉ.---------------------------------------यांना माहिती व अनुवर्तणास्तव अग्रेषित.

**मुळप्रत:-** मा.अध्यक्ष जि.नि.स.तथा जिल्हाधिकारी
कडून अनुमोदित.

**अध्यक्ष,जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हाधिकारी गोंदियाकरिता**